महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई-400 703.
M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai

परीक्षाप्राधान्य/महत्वाचे/कालमर्यादीत

क्र. मुंविमं/ माध्य.गोप./शिक्षक माहिती चेकलिस्ट /मार्च२०२३/२८२०
वाशी, नवी मुंबई. ४००७०३
दिनांक : १७/१०/२०२२

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा,
जि. मुंबई/बृहन्मुंबई/ठाणे / पालघर. /रायगड

विषय :- मार्च २०२३ मध्ये होणा-या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी सर्व कार्यरत विषय शिक्षकांची Check list तपासून पाठविणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून सर्व मान्यताप्राप्त शाळांना कळविण्यात येते की, माध्य.शालान्त प्रमाणपत्र परीक्षेतील उत्तरपत्रिका तपासण्याकरीता परीक्षक/नियामक यांच्या नियुक्तीसाठी सन २०२२ ते २०२४ या तीन वर्षाकरिता नवीन पॅनेल मागविण्यात आलेले होते. त्यानुसार मार्च -२०२२ मध्ये झालेल्या परीक्षेसाठी परीक्षक / नियामक यांची नियुक्ती Data सामाविष्ट करण्यात आलेली होती. मार्च-२०२३ मध्ये होणा-या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन/नियमन करण्यासाठी परीक्षक/नियामक यांची नियुक्ती करावयाची असल्याने आपल्या शाळेतील मंडळाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार शिक्षकांची संगणकीय यादी (Check list) आपणाकडे या पत्रासोबत तपासणीसाठी पाठविण्यात येत आहे. सदर यादी आपल्या अभिलेखानुसार व्यवस्थितरीत्या तपासावी व अशा सर्व विषय शिक्षकांची (कायम स्वरूपी/तात्पुरती नियुक्ती/घडयाळी तासावर) परिपुर्ण माहिती **दिनांक २१/११/२०२२** पर्यत मंडळ कार्यालयात रूम नं.३०१ मध्ये हस्तपोहोच देण्यात यावी. सदरचे प्रपत्र शिपाई यांचे मार्फत न पाठवता आपल्या शाळेतील लिपिकामार्फत मंडळात जमा करण्यात यावे, जेणे करून माहिती अपूर्ण असल्यास किंवा त्यामध्ये काही त्रुटी असल्यास त्याचे निराकरण तात्काळ करता येईल.

महाराष्ट्र राज्य खाजगी शाळा (सेवाशर्ती ) नियम-१९८१ व मंडळ मान्यता सेवाशर्ती मधील विहित तरतुदीनुसार, शासनाने सदर सेवा अनिवार्य केलेल्या असून सर्व शिक्षकांची माहिती देणे बंधनकारक आहे, याची नोंद घ्यावी.

अतिमहत्वाच्या सूचना-

Check list मधील सर्व शिक्षकांच्या माहितीचे रकाने पुर्ण भरण्यात यावेत. त्यांची संपूर्ण माहिती उदा. संपूर्ण नाव, विषय, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, परीक्षक/नियामक/ मुख्य नियामक पाळ्या (No.of Turn) व अनुभव, भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल क्रमांक) शाळेचा दूरध्वनी क्रमांक व मुख्याध्यापक यांचा मोबाईल क्रमांक (दुरूस्तीसह) इत्यादी माहिती दर्शविण्यात यावी. Check list मध्ये देण्यात आलेले मोबाईल क्रमांक अचूक व पूर्ण (10 Digit) स्वरूपात असावेत.

१. सदरच्या प्रपत्रावर विषय शिक्षकांने आपल्या नावासमोर आपली सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री करून घ्यावी त्यांनतर स्वाक्षरी करावी आणि प्रपत्र शेवटी मुख्याध्यापकांनी प्रमाणित करावे. तसेच शिक्षकांच्या फक्त सह्या न घेता यांच्या वरील बाबी निर्दशनास आणून दिल्यानंतर स्वाक्षऱ्या घ्याव्यात. काही शाळांमधील मुख्याध्यापक/लिपिक हे मंडळाने परिपत्रक निदर्शनास न आणता सह्या घेत असल्याच्या मौखिक तक्रारी येतात, तथापि असे होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२. आपल्या शाळेमध्ये विषय शिकविणा-या शिक्षकाची माहिती, उदा. विषयाचे माध्यम, प्रथम, द्वितीय व तृतीय भाषा, गणित (बीजगणित व भूमिती), विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग-१ व २, इतिहास-राज्यशास्त्र व भूगोल- अर्थशास्त्र (सामाजिकशास्त्रे), इत्यादी विषयांच्या सर्व शिक्षकांची माहिती देणे बंधनकारक आहे.

३. मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार निकाल विहित मुदतीत जाहीर करणे बंधनकारक असल्याने त्यासाठी शिक्षकांनी परीक्षण/नियमनाचे काम नाकारू नये तसेच सदरचे काम सुचनेनुसार वेळेत करावयाचे आहे, त्याकरीता सोबतच्या तक्त्यात सर्व शिक्षकांची परिपूर्ण माहिती देणे शाळाप्रमुखांवर बंधनकारक आहे. मा.न्यायालयाचा अवमान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

४. आपल्या शाळेतील एखादया शिक्षकाची बदली झाली असल्यास, बदली झालेल्या शाळेचा सांकेतांक क्रमांक व नांव त्याचप्रमाणे त्यांचेऐवजी आपल्या शाळेत बदलीने रूजू झालेल्या नवीन शिक्षकांची वरील सुचनेनुसार संपूर्ण माहिती Check list मध्ये पूर्ण भरण्यात यावी. तसेच एखादा शिक्षक सेवानिवृत्ती होत असल्यास त्याच्या नावासमोर 'दिनांक ---- रोजी सेवानिवृत्त' असा शेरा लिहावा.Check list मंडळामध्ये सादर केल्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांऐवजी नवीन शिक्षकाची नियुक्ती केली असल्यास त्याची माहिती वरीलप्रमाणे भरून देण्यात यावी.

५. Check list मध्ये शिक्षकाच्या नावासमोर शिकवित असलेला विषय कोड व शिक्षकाची शैक्षणिक अर्हता नमुद केलेली आहे ती बरोबर असल्याची खात्री करूनच शिक्षकाने स्वाक्षरी करावी, तसेच विषय कोड क्रमांक न बघताच सही होणार नाही, ही बाब मुख्याध्यापकांनी सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावी.

६. Check list मध्ये एखाद्या शिक्षकाचे नांव Double आल्यास त्या शिक्षकास मागील परीक्षेस कोणत्या विषयाच्या उत्तरपत्रिका मुल्यांकनाकरिता आलेल्या आहेत त्या विषयासमोर स्वाक्षरी करावी व दुस-या विषयासमोर स्वाक्षरी न करता Double Name असा लाल शाईमध्ये शेरा लिहावा.

७. Skill Devlopmemt **X1 , X2, X3, X4, X6, X7, X8, X9, 91, 92, 93, 95 , 97 , 98** व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी असणारे **J1, J5, J9 ,K1 ,K5, L7, M3 ,M6, M7** या दोन्ही विषयांच्या लेखी परीक्षेच्या उत्तर पत्रिकांचे मुल्यांकन करतील अशा शिक्षकांची नावे देण्यात यावीत. तसेच तुरळक विषय शिक्षकांची अचूक माहिती सादर करण्यात यावी.

८. ज्या शाळांमध्ये गणित व विज्ञान हे विषय सेमी इंग्रजी माध्यमातून शिकविले जातात त्या विषय शिक्षकांच्या माध्यमासमोर इंग्रजी (1) असा कोड दर्शविण्यात यावा. तसेच इतर शिक्षकांच्या माध्यमासमोर शाळेच्या माध्यमांचा कोड दर्शविण्यात यावा.

९. आपल्या शाळेतील शिक्षकाची तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्ती ही संपूर्ण शैक्षणिक वर्षासाठी आहे असे गृहीत धरून संबंधित अर्हताधारक शिक्षकांस उत्तरपत्रिका तपासणीसाठी पाठविल्या जाऊ शकतात. त्यामुळे "शिक्षक शाळा सोडून गेले/कमी करण्यात आले" अशा सबबी देऊन तपासणीसाठी आलेले उत्तरत्रिकांचे गठ्ठे मंडळाकडे परत पाठवू नयेत. सदर उत्तरपत्रिका त्या विषयाच्या अन्य पात्र शिक्षकाकडून तपासून घ्याव्यात. याबाबतची सर्व जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक यांची असून, तसा बदल केलेल्या परीक्षकाची माहिती मंडळास कळवावी.

१०. आपली शाळा रात्र शाळा असल्यास आपल्या शाळेतील शिक्षक दिवसा कोणत्या शाळेत (शाळेचा सांकेतांक क्रमांक), कोणता विषय शिकवित आहे याची माहिती स्वतंत्रपणे देण्यात यावी.

११. आपल्या शाळेतील शिक्षकाचा पाल्य इ.१०वी/इ.१२ वी मध्ये शिकत असल्याचे कारणाने परीक्षक/नियामकांचे उत्तरपत्रिका मूल्यांकनाचे काम रद्द करण्याची शिफारस करण्यात येऊ नये, अथवा अशा कारणांची Check list मध्ये नोंद करू नये. तसेच सर्व विषय शिक्षकांचे नाव Check list मध्ये समाविष्ट होईल याची शाळाप्रमुखांनी नोंद घेवून, Check list मधून अथवा Check list मध्ये नसलेल्या शिक्षकांचे नाव राहणार नाही याचीही दक्षता घ्यावी व अशा तक्रारी आल्यास याबाबत संबंधित मुख्यध्यापकांना जबाबदार धरले जाईल.

१२. शिक्षण उपसंचालक कार्यालयात सादर केलेल्या सरळ फॉर्ममधील शिक्षकांची नावे असलेली पृष्ठे सादर करण्यात यावी.

१३. सन २०२२–२०२३ या शैक्षणिक वर्षासाठी नियोजित शिक्षकांचे वेळापत्रकाची प्रत सादर करण्यात यावी. त्या त्या विषयासमोर शिक्षकांची नावे नमूद करण्यात यावी. तसेच आपल्या शाळेतील शिक्षकांच्या उत्तरपत्रिका तपासण्याबाबत काही अडचणी असल्यास उदा. वैद्यकीय कारण, जून–२०२३ सेवानिवृत्ती अशा शिक्षकांच्या नियुक्त्या कोणत्याही कारणास्तव रद्द करण्यात येणार नाही. त्यामुळे त्यांच्या Check list मधील नावासमोर लाल शाईने कोणताही शेरा न लिहिता त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी. **तसेच सोबत जोडलेल्या प्रपत्राची छायांकित प्रत काढून विषय निहाय शिक्षकांकडून भरून घेऊन सादर करण्यात यावे.**

(डॉ.सुभाष बोरसे)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उ.माध्य.
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवीमुंबई–४०० ७०३.

**टिप :– आपल्या शाळेची Check list प्राप्त होणे बंधनकारक आहे, प्राप्त न झाल्यास Check list कोणताही बदल नाही असे गृहीत धरून शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात येतील. सदर नियुक्ती संबंधित शिक्षकांस बंधनकारक राहील , याची नोंद घ्यावी. आपल्या शाळेतील एकाही शिक्षकाला परीक्षेच्या कामातून वगळण्यात येवू नये. मंडळाच्या तसे निदर्शनास आल्यास मुख्याध्यापकास सर्वस्वी जबाबदार धरण्यात येईल.**

प्रत--

१. शिक्षण उपसंचालक, मुंबई
२. शिक्षण निरिक्षक (पश्चिम/दक्षिण/उत्तर)
३. शिक्षणाधिकारी (माध्य.), ठाणे, पालघर ,रायगड

Panel Fix Number : ---------------

## Appendix 'A'
## Information of SSC Teacher's Only

1) Name of the Teacher (BLOCK CAPITAL LETTER :-

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

(SURNAME) (FIRST NAME) (MIDDLE NAME)

2) School Index No. : ---------------

3) Name of the School & Address : ---------------

Telephone No. : ---------------

4) Residential Address : ---------------

Telephone No. : ---------------

Mobile No. : ---------------

5) Education Qualification with Main Subject :---------------

6) Teaching Subject : ---------------

Other preference of subject taught for Std. X[th] only with code : ---------------

7) Medium : ---------------

8) Date of Appointment : ---------------

9) Date of Individual Approval of Education Dept. : ---------------

10) Teaching Experience : --------------- Total Year

11) Appointment Temporary/Permanent : ---------------

12) Examiner Turns :--------- / Moderator Turns --------- /Chief Mod. Turns ---------

Paper Setter Turns --------- / Translator Turns ---------

13) Date of Birth ---------------

Teacher Signature

प्रमाणित करण्यात येते की, इ. १० वी ला शिकविणारे संबंधित श्री/श्रीमती ---------------
--------------- यांनी भरलेली वरील माहिती बरोबर व अचूक आहे.

प्राचार्य भ्रमणध्वनी क्रमांक : ---------------

मुख्याध्यापक स्वाक्षरी
व शाळेचा शिक्का